**तातडीचे पत्र** -

जा.क्र. सीपीएस/जैकीना/२०१४-१५/१३८/गुनि-५/२०१४
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -४११००१
दिनांक - ११ सप्टेंबर २०१४

प्रति,

**१. विभागीय कृषि सहसंचालक -------------------------- (सर्व)**
**२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ----------------- (सर्व)**
**३. कृषि विकास अधिकारी , जिल्हा परिषद ------------------(सर्व)**

**विषय - सन २०१४-१५ साठी जैविक कीटकनाशके,फेरोमोन ट्रॅप्स व ल्युअर्स, परोपजीवी/परभक्षी मित्रकीडे यांचे विविध शासकीय योजनेत पुरवठा करावयाच्या कार्यपध्दतीबाबत...**

**संदर्भ** - १. शासन पत्र क्र. सीपीएस-२०१०/प्र.क्र.५८/१७ अे, दिनांक ८ ऑगस्ट २०११.
२. शासन पत्र क्र.सीपीएस २०१२/प्रक्र.२५६/१७-अे, दिनांक १० जुन २०१३.
३. आयुक्तालयाचे परिपत्रक जा.क्र.सीपीएस/जै.की.ना/मा.सू./२०१४-१५/८२/गुनि-५/२०१४, दि. २२/५/२०१४.
४. शासन निर्णय क्रमांक सीपीएस/१११४/प्रक्र-११३/१७अे, दिनांक ६ सप्टेंबर २०१४.

विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत अनुदानावर जैविक कीटकनाशके, फेरोमोन ट्रॅप्स, ल्युअर्स व परोपजीवी/परभक्षी मित्रकीडे यांच्या पुरवठ्यासाठी उपरोक्त शासन पत्र दिनांक ८ऑगस्ट २०११, अन्वये जिल्हास्तरावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समिती प्रायोगीक तत्वावर एक वर्षासाठी (ऑगस्ट २०१२ अखेरपर्यंत) कार्यरत होती. सदर समितीमार्फत यापुढील कालावधीमध्येही जैविक निविष्ठांच्या मागणीस मान्यता देण्याबाबत कृषि आयुक्तालयाचे पत्र ०१/०९/२०१२ नुसार शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास संदर्भिय शासन पत्र क्र.२ नुसार मे २०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदर समितीत जिल्हयाच्या जवळील जिल्हयातील शासकीय जैविक कीटकनाशक प्रयोगशाळांचे तंत्र अधिकारी यांचा समावेश करुन सदर समिती खालीलप्रमाणे गठीत करण्याचे प्रस्तावीत केले होते.

अ) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी - अध्यक्ष
ब) कृषि उपसंचालक (जि.अ.कृ.अ. कार्यालय) - सदस्य
क) जिल्ह्याशी संलग्न कृषि विद्यापीठातील एक तज्ञ - सदस्य
ड) जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरिक्षक - सदस्य
इ) जिल्हयाच्या जवळील जिल्हयातील शासकीय जैविक कीटकनाशक प्रयोगशाळांचे तंत्र अधिकारी - सदस्य
ई) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यलयातील तंत्र अधिकारी - सदस्य सचिव

संदर्भिय शासन निर्णय दिनांक ६ सप्टेंबर २०१४ अन्वये जिल्हास्तरीय समितीस शासनाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharastra. gov.in ) उपलब्ध आहे. सदर शासन निर्णयानुसार जिल्ह्यात राबविण्यात येणा-या विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत जैविक कीटकनाशके, फेरोमोन ट्रॅप्स व ल्युअर्स, परोपजिवी/परभक्षी कीडे, यांच्या पुरवठ्यासाठी उपरोक्त गठीत केलेल्या समितीद्वारे खालीलप्रमाणे कार्यवाहीचा अवलंब करावा.

१. विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत जैविक कीटकनाशके, फेरोमोन ट्रॅप्स व ल्युअर्स, परोपजिवी/परभक्षी कीडे तसेच जैविक खते व सूक्ष्म मूलद्रव्ये यांची मंजुर भौतीक/आर्थिक लक्षांकानुसार जिल्ह्याची मागणी विचारात घेवून वरील समितीकडे योजनानिहाय संकलित मागणी मंजूरीसाठी सादर करावी. समितीने मंजूरी दिल्यानुसार निविष्ठांची मागणी सविस्तर पुरवठा आदेशाद्वारे थेट शासकीय जैविक कीटकनाशक प्रयोगशाळा/कृषि विद्यापिठे/कृषि विज्ञान केंद्रे शासनमान्य पुरवठा संस्थांकडे नोंदवावी. दिलेल्या उद्दीष्टापेक्षा जास्त निविष्ठांची मागणी /खरेदी करता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

२. स्थानिक परिस्थितीनुसार, कीड-रोगाच्या अनुषंगाने, निविष्ठा उपलब्धतेच्या अनुषंगाने पूर्वी ठरविलेल्या निविष्ठा संचामध्ये काही बदल करावयाचे झाल्यास कृषि विद्यापीठातील संबंधित शास्त्रज्ञाचे सल्ल्यानुसार जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांना बदल करता येईल. मात्र, याबाबत कृषि आयुक्तालयाचे परिपत्रक क्रमांक सीपीएस/जैकिना/मा.सु./२०१४-१५/८२/गुनि-५/२०१४,दि २२/५/२०१४ मधील अ.क्र-३ अन्वये दिलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करणे संबंधीतांना बंधनकारक राहील.

३. जैविक कीटकनाशकांच्या मात्रा व शिफारशी केंद्रीय कीटकनाशक नोंदणी मंडळाने दिलेल्या आहेत. याव्यतिरिक्त कृषि विद्यापिठातील शास्त्रज्ञांच्या शिफारशी असल्यास शास्त्रज्ञांचा सल्ला लेखी स्वरुपात घेणे बंधनकारक राहील,व त्यानुसार जैविक कीटकनाशकांचा वापर करता येईल.

४. जैविक कीटकनाशके, फेरोमोन ट्रॅप्स, व ल्युअर्स, जैविक खते व सुक्ष्म मुलद्रव्ये यासंदर्भात या व्यतिरिक्त कृषि आयुक्तालयाने वेळोवळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांच्या/परिपत्रकांच्या अधिन राहुन कार्यवाही करावी.

५. विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांर्तगत बाब बदल करावयाचा झाल्यास शासन निर्णयातील तरतुदीनुसार व संबंधित योजनेच्या मार्गदर्शक सुचनांचे आधिन राहुन आवश्यक कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

याबाबत इतर बाबी दिनांक २२ मे २०१४ च्या मार्गदर्शक सुचनांनुसार जशाच्या तशा लागु राहतील.

स्वाक्षरीत/-

**कृषि संचालक (नि. व गु.नि.)**

**कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-१**

**प्रत :-** १) **मा. अपर मुख्य सचिव, कृषि व पणन विभाग,** मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) **मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ,** मुंबई-६५, यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सविनय सादर.

३) **मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ**, अकोला यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सविनय सादर.

४) **मा. व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान**, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ यांना माहितीस्तव सविनय सादर.

५) **कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ५**

६) **कृषि संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५**यांना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव.

७) **मा.सशोधन संचालक / विभाग प्रमुख**, कृषि कीटकशास्त्र विभाग / वनस्पती विकृतीशास्त्र विभाग, यांना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव.

१) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर.

२) मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.

३) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला .

४) डॉ. बाळासाहेब सावंत, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.

८) कृषि सहसंचालक, (नियोजन व समन्वय), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -५ यांना माहितीस्तव.

९) मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र पुणे-१ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१०) कृषि उपसंचालक (प्रयोगशाळा) यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना. त्यांना सूचित करण्यात येते की, नमुन्यांचे विश्लेषण प्राधान्याने तात्काळ करुन देण्याबाबत आपल्या स्तरावरुन सूचना निर्गमीत कराव्यात.

११) कृषि उपसंचालक (पीक संरक्षण) यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना. शासकीय प्रयोगशाळांकडून होणा-या पुरवठ्याबाबत आपण सनियंत्रण करावे.

१२) कृषि उपसंचालक (गळीतधान्य/कडधान्य/तृणधान्य/नगदी पीके/राष्ट्रीय अन्न सुरक्षा) यांना माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.

१३) तंत्र अधिकारी, शासकीय जैविक कीटकनाशक प्रयोगशाळा अहमदनगर / जळगाव / धुळे / औरंगाबाद /परभणी / नांदेड / यवतमाळ / बुलढाणा / अमरावती / वर्धा यांना माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.

१६) कार्यासन अधिकारी विप्र १/३/४/७/१२ , यांना माहितीस्तव रवाना. त्यांना सूचित करण्यांत येते की, त्यांचेकडून राबविण्यात येत असलेल्या योजनांच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये याबाबत योग्य ते बदल करुन संबधितांना त्वरीत कळवावे.